Exh. 12

रे.क.नं.२२/२०२६

**मे. कागल येथील सि.ज.ज्यु.डि.**

**यांचे कोर्टात ...**

मारुती तुकाराम पाटील ......... वादी

विरुध्द

शेवंता शिवाजी पाटील वगैरे ......... प्रतिवादी

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र</u>**

**<u>नि.५ चे कामी.</u>**

Order
Read And Recorded.
Dt.8.4.26 C.J.J.D.

मी श्री. चंद्रकांत संतू पोवार, व.व.53 ,धंदा-शेती, रा.बिद्री, ता.कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.08 17:14:30 +0530

..२/-

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१) मला वादी, प्रतिवादी व दावा मिळकत माहिती आहे.

२) तुकाराम गोपाळा पाटील हे प्रतिवादी नं.१ चे वडिल होय. प्रतिवादी नं.१ बिद्री, ता.कागल येथे राहणेस असल्याने व तुकाराम गोपाळा पाटील हे त्यांचेकडे वरचेवर येत असल्याने माझा त्यांचेबरोबर घरोबा होय. सदर तुकाराम गोपाळा पाटील यांची पत्नी सोनाबाई या आजारी असताना त्यांचे औषधोपचाराकरिता प्रतिवादी नं.१ कडून वेळोवेळी रक्कम रुपये ३,३०,०००/- सदर तुकाराम गोपाळा पाटील यांनी घेतलेली होती. सदर रक्कमेच्या मोबदल्यात दावा मिळकत प्रतिवादी नं.१ ला विक्री करण्याचे सदर तुकाराम पाटील यांनी ठरविले होती. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१८ इ. रोजी खरेदीपत्र करावयाचे आहे असे मला सांगितलेले होते. त्याप्रमाणे मी स्वत: तसेच सदर तुकाराम गोपाळा पाटील, बाळासो तुकाराम पाटील, प्रतिवादी नं.१ तसेच रणजीत बंडा पाटील, सर्जेराव तुकाराम जितकर व प्रताप कृष्णा तिबिले असे सर्वजन मुरगूड, ता.कागल येथे दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ हजर होतो. त्यावेळी प्रतिवादी नं.१ चे वडिल तुकाराम यांचे संबंधीत मुंबई येथील विधीज्ञ बाळासाहेब देसाई हे देखील तेथे आले होते. सदर विधीज्ञांना तुकाराम गोपाळा पाटील यांनी

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

खरेदीपत्राबाबत माहिती दिली. त्याप्रमाणे सदर विधीज्ञांनी टंकलेखनिका कडून खरेदीपत्राचा मसुदा तयार करुन घेतला. त्यानंतर सदर विधीज्ञांनी सदरचे खरेदीखतातील मजकूर प्रतिवादी नं.१ तसेच तुकाराम गोपाळा पाटील, बाळासो तुकाराम पाटील व आम्ही सर्वजण उपस्थित इसमांना वाचून दाखवला. त्यानंतर माझे समक्ष प्रतिवादी नं.१ व तुकाराम गोपाळा पाटील यांनी खरेदीपत्रावरती आपला अंगठा केलेला आहे. त्यास दस्तूर सदर मा.विधीज्ञांनी लावलेला आहे. तसेच बाळासो तुकाराम पाटील यांनी माझे समक्ष आपली सही व अंगठा केलेला आहे. त्यानंतर मी स्वत: व रणजीत बंडा पाटील यांनी साक्षीदार म्हणून खरेदीपत्रावरती सह्या व अंगठे केलेले आहेत. त्यानंतर सर्जेराव जितकर व प्रताप तिबिले यांनी खरेदीपत्रा वरती ओळखदार म्हणून आपल्या सह्या व अंगठे केलेले आहेत. सदरचा दस्त मा.दुय्यम निबंधक,मुरगूड यांचे कार्यालयात नोंदणीकृत केलेला आहे. सदर विधीज्ञांनी सदरचा दस्त लिहिणार म्हणून दस्तूर म्हणून आली सही केलेला आहे. खरेदीपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचे खरेदीपत्रा मला दाखविलेस ते मी ओळखू शकतो. सदर खरेदीपत्राने दावा मिळकतीची मालकी व वहिवाट प्रतिवादी नं.१ ची झालेली आहे.

01/04/2026

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

वरील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले प्रतिज्ञापत्र आज मु।। कागल, ता.०१/०४/२०२६.

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादीतर्फे साक्षीदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील प्रतिज्ञा पत्रामधील संपूर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल, दि. ०४/०४/२०२६.

I Know the Deponent
K.A.K.
(Adv. K.A. Kulkarni)

Solemnly affirmed before me by
Shri
who is
identified by Shri
whom I know personally
Dated 01/04/2026

Assistant Superintendent